FORM-1A

0058160

N.C.R.B.

I.I.F.-I

## पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No.: 12, वर्ष Year: 2024, दिनांक Date: 6/4/2024

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. 1988, कलमे Sections: 7, 12

(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence: Day: गुरुवार, तारीख पासून Date from: 4/4/2024, वेळ Time: ते, दि. 5/4/2024 रोजी, तारीख पर्यंत Date to, वेळ Time: 16:00 वा. चे दरम्यान

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00

(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date: 4/4/2024, वेळ Time ........

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 01/24, तारीख Date: 6/4/24, वेळ Time ........

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........

Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name, No., Ward, Name of road: कॅफे मेट्रो, रेस्टॉरन्ट, आनंदीलाल पोद्दार मार्ग, न्यू मरीन लाईन्स, अपोलो हॉटेल, मरीन लाईन्स, मुंबई, राज्य महाराष्ट्र

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........ गांव ........ पोस्ट ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........

Nearest identifiable place, Village, Post, Taluka, Dist., State

(c) पोलीस ठाणेचे हदीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........

In case, outside the limit of this Police Station, Taluka, Dist., State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: श्री. प्रकाश सराफ

(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: कैलास सराफ

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 55 वर्षे

(d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: 9177448600

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........, दिल्याचे ठिकाण Place of Issue ........, (f) व्यवसाय Occupation: सोनारकाम

(g) धर्म Religion: हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address: 49, विठ्ठल विठ्ठल बिल्डिंग, पहिला मजला, खत्तर गल्ली, सी. पी. टँक, मुंबई - 400 004

(वॉर्ड Ward, घर / नावाचा नं. House/Name No., फोन / मो. नं. Phone/M. No., पॅन नं. PAN No., व्होटर्स नं. Card No.)

रस्त्याचे नाव Road ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........, सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, If necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

(1) श्री. मंगेश चंद्रकांत कांबळे, वय-37 वर्षे, कनिष्ठ अभियंता (2) श्री. सुरज शिवाजीराव पवार, वय-43 वर्षे, दुय्यम अभियंता दोन्ही सी वॉर्ड (इमारत व कारखाने विभाग) मनपा, मुंबई (3) श्री. मितेश जयंती होडार, वय-37 वर्षे (खाजगी इसम) रा. 3/68, नाखुदा चाळ, चंदनवाडी, मरीन लाईन्स मुंबई

फिर्यादी श्री. प्रकाश कैलास सराफ, वय. 55 वर्षे, व्यवसाय- सोनारकाम, रा.ठि. 49, विठ्ठल निलया, पहिली खत्तर गल्ली, सी.पी.टँक, मुंबई यांची फिर्याद स्वतंत्र कागदावर नोंद करण्यात आली असून तीच या गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(मोहन जगदाळे)
पोलीस निरीक्षक
का.प्र.वि. मुंबई

## फिर्याद

दिनांक ०५/०४/२०२४

श्री. प्रकाश कैलाश सराफ, वय ५५ वर्षे, धंदा– सोनारकाम, रा.ठि. ४९, विठ्ठल, व्हिला, ०१ ली खत्तर गल्ली, सि.पि. टॅक, मुंबई ४००००४. मो.क्र. ८८२८३४१४६०/ ७९७७४४८६००

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझ्या कुंटुबियासोबत जन्मापासून राहत आहे. मी व माझे पार्टनर श्री. प्रमोद अगरवाल यांनी मिळून दि. १९/१०/२०२३ रोजी वैद चेंबर, बिल्डींग नं. ४२, दुसरा भाईवाडा लेन, मुंबई ४००००२ हि बिल्डींग भागीदारीमध्ये खरेदी केलेली आहे. माझे भागीदार हैदराबाद येथे रहावयास असल्याने सदर बिल्डींग संदर्भातील सर्व व्यवहार मी पाहतो.

सदर बिल्डींगमध्ये दोन रेसिडन्शिअल व १४ कमर्शियल असे १६ भाडोत्री आहेत. सदर बिल्डींगच्या टेरेसवर पावसामुळे पत्र्याची शेड लावलेली आहे. सन २००५ मध्ये पाचव्या माळयावरील भाडोत्रींच्या गाळयाला पोटमाळा केलेला आहे.

दि. १३/०३/२०२४ रोजी सदर बिल्डींगच्या पाचव्या माळयावरील शिडी जवळ C/DOC/221/351-MMC ACT/C63N01/12-03-2024 अशी नोटीस बिएमसी सी वॉर्ड कडून चिटकविण्यात आलेली होती. त्यामुळे मी दि. १४/०३/२०२४ रोजी सी वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका येथे इमारत व कारखाने विभाग येथे जावून सदर नोटीसबाबत विचारणा केली. सदर नोटीस श्री. मंगेश कांबळी, सी वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी लावली असल्याचे मला समजले म्हणून मी त्यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी माझा मोबाईल नंबर घेतला व ते मला फोन करतील तेव्हा शारदा हॉटेल, धनजी स्ट्रीट, पायधुनी, मुंबई येथे भेटावयास येण्याबाबत सांगितले.

दि. २१/०३/२०२३ रोजी श्री. मंगेश कांबळी यांनी मला माझ्या मो.क्रं. ८८२८३४१४६० वर त्यांचे मो.क्र.७७३८५२०६५५ वरुन फोन केला व मला भेटण्यास बोलाविले. त्यानुसार मी त्यांना शारदा हॉटेल, धनजी स्ट्रीट, पायधुनी, मुंबई येथे भेटलो. त्यावेळी त्यांच्यासोबत एक व्यक्ती तेथे हजर होती. श्री.कांबळी यांनी ते त्यांचे वरिष्ठ अधिकारी पवार असल्याचे सांगितले. श्री.पवार यांनी माझ्या बिल्डींगच्या टेरेसवरील पत्र्याची शेड व पाचव्या माळयावरील पोटमाळा अनधिकृत असल्याचे सांगून ते तोडावे लागेल असे सांगून त्यावर कारवाई न होण्याकरीता ४२ लाख रकमेच्या लाचेची मागणी केली. सदर रक्कम जास्त असून मला जमणार नाही असे मी त्यांनी सांगितले. त्यानंतर कांबळी साहेब हे मला ०४ ते ०५ वेळा भेटले. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे कारवाई न करण्याकरिता श्री.पवार यांनी सांगितलेल्या रकमेची मागणी केली. मी त्यांना माझेकडे एवढे पैसे नसल्याचे समजावून सांगितले.

दि. ०३/०४/२०२४ रोजी कांबळी साहेबांनी मला पुन्हा शारदा हॉटेल या ठिकाणी भेटण्यास बोलाविले व वैद चेंबर मधील पत्र्याचे शेड व पोटमाळयाचे अनधिकृत बांधकामावर कारवाई न करणेकरीता वीस लाख रुपये इतक्या रक्कमेच्या लाचेची मागणी केली. मला नमूद कांबळी व पवार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.०४/०४/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, वरळी या कार्यालयात त्यांच्याविरुध्द तक्रार केली. माझे तक्रारीवर कारवाई करण्याकरीता पोनि मोहन जगदाळे यांची नेमणूक केली तसेच पोनि पंकज शिंदे यांची पर्यवेक्षक अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यांनी माझ्याकडे तक्रारीबाबत सखोल विचारणा करून माझी लेखी तक्रार लिहून घेतली. पोनि जगदाळे यांनी मी दिलेल्या तक्रारीची प्रथम दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी होणार असल्याचे सांगून दोन शासकीय पंचांना पाचारण केले व माझी त्यांच्याशी ओळख करून दिली. सदर पंचांनी मला मी दिलेल्या तक्रारीबाबत माझ्याकडे चौकशी केली.

पोनि जगदाळे यांनी मला तक्रारीची पडताळणी करणेकरीता कांबळी व पवार यांची भेट घ्यावी लागणार असे सांगून आमचेमधील फोनवरील व प्रत्यक्ष भेटीतील संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमधून एस.डी. कार्ड मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि जगदाळे, पंच, पोलीस पथक असे साधनसामुग्रीसह शासकीय वाहनातून पडताळणी कारवाईकरीता सर वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिशेने रवाना झालो. काही अंतरावर

जावून पोनि जगदाळे यांनी मला कांबळी यांना फोन करून भेटण्याची वेळ व ठिकाण विचारण्याबाबत सांगून व्हॉईस रेकॉर्डर चालू केला. त्यावेळी मी माझे मो.क्रं. ८८२८३४१४६० यावरून श्री. कांबळी यांना त्यांचे मो.क्रं. ७७३८५२०६५५ वर फोन केला प्रथम त्यांनी फोन उचलला नाही. म्हणून मी पुन्हा श्री. कांबळी यांना फोन केला तेव्हा त्यांनी फोन उचलुन भेटण्याबाबत श्री. पवार यांचेशी बोलून कळवतो असे सांगितले. त्यानुसार काही वेळातच श्री. कांबळी यांनी मला फोन करून १० ते १५ मिनिटात बी.एम.सी वॉर्ड, चंदनवाडी, मुंबई येथे येण्याबाबत सांगितले. आम्ही रस्त्यात असताना माझ्या मोबाईलवर पुन्हा श्री. कांबळी यांचा फोन आला. त्यावेळी त्यांनी मला काळबादेवी येथील हॉटेल कृष्णमुरारी येथे येण्याबात सांगितले. सदर कॉल व्हॉइस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात आला. पोनि जगदाळे यांनी मला पंच क्र. ०१ श्री. धर्मेंद्र शिंदे हे माझ्यासोबत माझ्या बिल्डींगचे पाचव्या माळयावरील टेनंटचे कामगार बंगाली बाबू म्हणून जातील असे सांगून व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझ्या शर्टच्या आतील बनियानला लावला.

मी व पंच धर्मेंद्र शिंदे असे श्री. कांबळी व श्री. पवार यांना जावून भेटलो असता श्री.पवार व श्री.कांबळी यांनी माझेकडे पत्रा शेड निष्कासन न करण्याकरिता रू. पंधरा लाख व बंगाली बाबूच्या पोटमाळयाचे निष्कासन न करण्याकरिता रू. पाच लाख असे मिळून एकूण रू. वीस लाख रकमेच्या लाचेची मागणी केली. मी श्री. कांबळी व श्री. पवार यांना सदर रक्कम एकरकमी देणे शक्य नसल्याचे सांगून दुस-या दिवशी म्हणजे दिनांक ५/४/२०२४ रोजी रू. आठ लाख व उर्वरीत रक्कम पंधरा दिवसानंतर देईन असे सांगितले. त्या दोघांनीही ते मान्य केले. त्यानंतर मी व पंच श्री.धर्मेंद्र शिंदे पोलीस पथकाजवळ येवून पथकास सर्व हकिगत सांगितली. त्यानंतर पोनि.जगदाळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर बंद करून ध्वनीमुद्रित संभाषण ऐकले असता त्यामध्ये श्री. पवार यांनी " आपका **सतरा इनका पाच** " व कांबळी यांनी " **दोनो का बीस खतम, देने का अभी कैसा करने का लाख रूपये कम करने का** " वगैरे बोलून लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

दि. ०५/०४/२०२४ रोजी मी एक लाख रकमेची सोय करून लाप्रवि, वरळी कार्यालयास गेलो. पोनि जगदाळे यांनी माझेकडील रू. ५००/- दराच्या २०० नोटांमध्ये त्यांच्याकडील खेळण्यातल्या रू. ५००/- दराच्या १४०० नोटा वापरून एकूण रू. ८,००,०००/- रक्कम तयार केली. त्यानंतर मी श्री.कांबळी यांना माझ्या नमूद मोबाईल फोनवरुन फोन केला. त्यावेळी श्री.कांबळी यांनी " तो आज क्या हुआ अपना " अशी विचारणा केली. मी त्यांना " आधा पावणा घंटे में कर लेता हुँ " बोलणे केले. ते संभाषण ध्वनीमुद्रित करण्यात आले.

त्यानंतर त्या नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्यात आली. सदर रक्कम पांढ-या रंगाच्या पिशवीत ठेवून ती पिशवी पिवळया रंगाच्या प्लास्टिकच्या पिशवीमध्ये ठेवण्यात आली. त्या दोन्ही पिशव्यांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्यात आली. ती पिशवी श्री. कांबळे व श्री. पवार यांना देण्याकरीता माझ्याकडे दिली.

त्यानंतर आवश्यक कारवाई करून पोलीस पथक, पंच व साधनसामुग्रीसह सापळा कारवाईकरीता शासकीय वाहनातून बृहन्मुंबई महानगरपालिका सी वार्ड च्या दिशेने रवाना झालो. रस्त्यातच वाहनातून मी माझ्या मोबाईलवरून श्री. कांबळी यांना त्यांच्या मोबाईलवर फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही. काही वेळातच त्यांचा माझे मोबाईलवर फोन

समक्ष,

(सही)

**( मोहन जगदाळे )**
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Prakash Saraf

आला असता त्यांनी मला '' **मेरा बंदा आयेगा...निलेश करके...वो तुमको फोन करेगा उसके पास दे देना** '' असे सांगितले त्यानंतर काही वेळाने मला ८९२८११०८७४ या मोबाईल नंबरवरुन फोन आला. सदर फोनवर बोलणा—या व्यक्तिने त्यांचे नाव निलेश सांगून मेट्रो जवळ भेटण्यास बोलाविले. आमचे मोबाईलवरील संभाषण व्हॉईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रित करण्यात आले. मला पोनि, जगदाळे यांनी सुचना देवून त्यांनी पैसे स्विकारल्यास इशारा म्हणून माझ्या डोळयावरील चष्मा काढून शर्टच्या खिशामध्ये ठेवण्यास सांगितले.

श्री. कांबळी यांचे सांगणेवरुन निलेश यास भेटण्यास जाताना पोनि, जगदाळे यांनी माझ्या शर्टच्या आतील बनियानला व्हॉईस रेकॉर्डर लावून चालू केले. त्यानंतर मी श्री. कांबळी यांनी सांगितलेला इसम नामे श्री. निलेश होडार हे भेटलो व हॉटेल मेट्रो कॅफे मध्ये जावून बसलो. त्यावेळी पंच व पोलीस पथक आजूबाजूस थांबले होते. श्री. निलेश होडार व मी बोलत असतांना निलेश याने मला आणलेली लाचेची रक्कम देण्याबाबत इशारा केला. त्यावेळी श्री.कांबळी यांचा निलेश यास फोन आला. त्यावरुन मी कांबळी यांना '' **इनके पास कर दू ना, मैं दे रहा हूँ भाय** '' अशी खात्री करुन श्री. कांबळी व श्री. पवार यांना लाचेची रक्कम देण्याकरिता आणलेले रू. ८,००,०००/— असलेली पिशवी निलेश होडार याच्याकडे दिली व त्याने ती स्विकारली. त्यावेळी मी पुर्व नियोजित ठरलेल्या इशा—याप्रमाणे डोळयावरील चष्मा काढून शर्टच्या खिशामध्ये ठेवला. त्यावेळी आजुबाजूस असलेल्या पोनि जगदाळे व पोलीस पथक यांनी निलेश होडार यास लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले. त्यानंतर पोनि.जगदाळे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. पोलीस पथकाने श्री. निलेश होडार यांचेकडे श्री. कांबळी व श्री. पवार यांचेबाबत विचारणा केली असता त्यांनी श्री. कांबळी व श्री. पवार हे थोडया अंतरावर असलेल्या हॉटेल श्रीजीस मध्ये असल्याचे सांगितले. त्यानुसार पोलीस पथकाने हॉटेल श्रीजीस मधून श्री. कांबळी व श्री. पवार यांना ताब्यात घेतले.

माझे, श्री. मंगेश कांबळी, श्री. सुरज पवार व श्री. निलेश होडार यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत. श्री.मंगेश कांबळी यांचे पुर्ण नाव मला आज रोजी समजले. मला त्यांचे नाव कांबळे असे माहित असल्याने मी केलेल्या तक्रारीमध्ये श्री.मंगेश कांबळी यांचे नाव कांबळे असे सांगितले होते.

तरी श्री.मंगेश कांबळी, कनिष्ठ अभियंता, सी वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका व श्री.सुरज पवार, दुय्यम अभियंता, सी वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी माझ्या भागीदारीमध्ये असलेल्या वैद बिल्डींगच्या टेरेसच्या पत्र्याचे शेड व पाचव्या मजल्यावरील पोटमाळयाचे अनाधिकृत बांधकामावर कारवाई न करणेकरीता एकूण रु. २०,००,०००/— ( अक्षरी रु. वीस लाख फक्त ) इतक्या रक्कमेची मागणी करून त्यांचेवतीने श्री. निलेश होडार (खाजगी इसम) याने दिनांक ५/४/२०२४ रोजी पहिला हप्ता म्हणून रू. ८,००,०००/— (आठ लाख रू. फक्त त्यामध्ये भारतीय चलनी व खेळण्यातील नोटा) स्विकारले. म्हणुन माझी श्री.मंगेश चंद्रकांत कांबळी कनिष्ठ अभियंता, श्री.सुरज शिवाजीराव पवार दुय्यम अभियंता दोघेही सी वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका व श्री.निलेश जयंती होडार (खाजगी इसम) यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला हिंदीत समजावून सांगितली. ती मी वाचून पाहिली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( मोहन जगदाळे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Prakash Saraf

फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..............................................................................................................

10. (a) ~~चोरीस गेलेल्या~~ / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य रोख रु. 8,00,000/- (रु. 1,00,000/- भारतीय चलनातील व

Total Value of properties stolen / involved रु. 7,00,000/- खेळण्यातील नोटा)

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) हस्तगत केलेली रक्कम

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..............

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page. यातील तक्रारदार यांच्या मालकीच्या इमारतीच्या पाचव्या मजल्यावरील पोटमाळ्याचे बांधकामाचे निष्कासनाची कारवाई करण्याकरिता आलोसे क्र. 1 यांनी नोटीस बजावली होती. सदर नोटीसच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी आलोसे क्र. 1 व 2 यांची भेट घेतली असता त्यांनी कारवाई न करण्याकरिता रु. 20,00,000/- इतक्या लाचेची मागणी केल्याचे तक्रारदार यांनी केलेल्या अर्जाच्या पडताळणीमध्ये निष्पन्न झाले व दि. 5/4/2024 रोजी सदर लाचेच्या रकमेपैकी पहिला हप्ता ठरल्याप्रमाणे रु. 8,00,000/- आरोपी क्र. 3 यांनी आलोसे क्र. 1 व 2 यांच्यावतीने स्विकारले म्हणून गुन्हा कलम 7, 12 भ्र.प्र.अधि. अन्वये नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अमलदाराचे नाव व हुद्दा : मोहन जगदाळे, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ..............

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .............., जिल्हा .............., राज्य ..............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.............................. (3) Transferred to P. S. ..............................

District.............................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली. [signature]

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [signature]

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name मोहन दादू जगदाळे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई

तपासिक अं. चा कोड क्र. ..............

Posting

Code No. of I. O. ..............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 6/4/2024

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**